रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

गुरूवार, जून २६, २००८/आषाढ ५, शके १९३०

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून २००८.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सीडीआर. १००७/प्र.क्र. १२/०७/११.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (दुसरी सुधारणा) नियम, २००८ असे म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ८ ऐवजी पुढीलप्रमाणे नियम दाखल करण्यात यावा,—

" ८. **कार्यालयीन माहिती पुरविणे.**—प्रत्येक शासकीय कर्मचारी आपली कर्तव्ये सद्‌भावपूर्वक पार पाडीत असताना, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यानुसार एखाद्या व्यक्तीस माहिती देईल व त्याच्या तरतुदींनुसार संबंधित व्यक्तीला माहिती देऊ शकेल :



[**किंमत :** रुपये ५.००]

परंतु, कोणताही शासकीय कर्मचारी शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार किंवा त्याच्यावर सोपविण्यात आलेली कर्तव्ये सद्भावपूर्वक पार पाडीत असेल, ते खेरीजकरून, कोणताही कार्यालयीन दस्तऐवज किंवा त्याचा कोणताही भाग किंवा वर्गीकृत माहिती देण्यास त्यास प्राधिकृत केले नसेल, अशा कोणत्याही शासकीय कर्मचा-यास किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे देणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या नियमातील कोणतीही गोष्ट, एखाद्या शासकीय कर्मचा-यास किंवा इतर व्यक्तींना अनधिकृत रितीने किंवा अनुचित फायद्यासाठी वर्गीकृत माहिती पुरविण्याची परवानगी देते, असा तिचा अर्थ केला जाणार नाही.”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. ल. पाठक,**
शासनाचे उप सचिव.

क्रमांक सीडीआर. १००७/प्र.क्र. १२/०७/११,
**सामान्य प्रशासन विभाग**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ४ जून २००८.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालयीन प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

---
*पत्राने

**का. तु. सातकर,**
शासनाचे अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th Jun 2008

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. CDR. 1007/C.R.12/7/11.—In Exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Conduct) (2nd Amendment) Rules, 2008.

2. For rule 8 of the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979, the following rule shall be substituted, namely :—

" 8. *Communication of official information*.—Every Government servant shall, in performance of his duties in good faith, communicate information to person in accordance with the Right to Information Act, 2005 (22 of 2005) and the rules made thereunder :

Provided that, no Government servant shall, except in accordance with any general or special order of the Government or in the performance in good faith of the duties assigned to him, communicate, directly or indirectly, any official document or any part thereof or classified information to any Government servant or any other person to whome he is not authorised to communicate such document or classified information.

*Explanation*.—Nothing in this rule shall be construed as permitting communication of classified information in an unauthorized manner or for improper gains to a Government servant or others ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. L. PATHAK,
Deputy Secretary to Government.

No. CDR. 1007/C.R.-12/7/XI,
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
MANTRALAYA, MUMBAI 400 032,
DATED THE 4TH JUN 2008.

Copy forwarded with compliments for information to :

The Secretary to the Governor,

The Principal Secretary to the Chief Minister,

The Principal Secretary to the Deputy Chief Minister,

The Private Secretaries to all Ministers,

The Personal Assistants to all Ministers of state,

All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/ Setretaries to Government of Maharashtra,

* Prothonotary and Sr. Master, High Court (Original Side), Mumbai,

* The Registrar, High Court, Appelate Side, Mumbai,

* The Registrar, Office of the Lokayukta Upa Lokayukta, Mumbai,

* The Secretary, Maharashtra Legislature Secretariate, Mumbai,

* The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,

* The Secretary, State Election Commission, Mumbai,

All Other Departments of the Mantralaya, Mumbai,

The General Administration Department (All Desks),

All Other Heads of Departments and Heads of Offices under Sereval Departments of the Maharashtra.

--------------

*By letter.

K. T. SATKAR,
Under Secretary, to Government.